For D.G. Associates.

**सुप्रिम इंडस्ट्रिअल प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित.**

पत्ता :– स.न.४९/१, पर्वती, पुणे:–४११ ००९.

नोंदणी क.:– पीएन्ए/पीएन्ए– १ / जीएनएल (सी)/४३४/१९९८–१९९९.

नोंदणी दिनांक :–१५/०५/१९९८.

---

## विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

**सभा दिनांक :- शनिवार २६ जून २०२१**

**सभेची वेळ :- सायंकाळी ५ वाजता. श्री. घोडके शोरुम येथे पार पडली.**

संस्थेची वरील सभा ठिक ५.३० वाजता सुरूवात करण्यात आली. सभेच्या अध्यक्ष स्थानी श्री विजय नाईक होते. सभेला एकूण १० सभासद हजर होते . सर्व सभासदांना नोटीस व्हाट्सअप ग्रुप वर व ई मेल ने पाठविली होती नियमानुसार सभेमध्ये घेतलेले निर्णय सर्व सभासदांवर बंधनकारक राहतील असे नमूद करण्यात आले होते. काही सभासदांनी पूर्व सूचना दिली आहे असे सांगण्यात आले.

**सभेमध्ये पुढील विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.**

**विषय क्रमांक :१ :-** संस्थेचा फिजिबिलिटी रिपोर्ट सर्व सभसदांसमोर सादर करणे.

**ठराव क्रमांक:१ :-** आर्किटेक्ट चैतन्य पेशवे यांनी झूम माध्यमाद्वारे मीटिंग ला हजर राहून सर्व सभासंदासमोर डिजिटली फिजिबिलिटी रिपोर्ट सादर केला . त्यामध्ये संस्थेला एकूण मिळणारा एफएसआय , टी डी आर , प्रिमियम असे सर्व पॉइंट्स एकत्रित करून मिळणारे बांधकाम किती असेल, डेव्हलपरची गुंतवणुक , त्याचे रिटर्न्स, आणि सभासदांना देण्यात येणारा जादा एरिया काय असू शकेल अशी सर्व माहिती सभासंदासमोर सादर करण्यात आली. तसेच , नवीन बिल्डिंग व्यापारी आणि घरगुती वापरासाठी बांधकाम करू शकता येईल का ? या बाबत स्पष्टीकरण केले त्यानुसार प्लॉट साईज पाहता एका वेळी व्यावसायिक

प्रकल्प करणे फायद्याचे होईल तसेच , सातारा रोड लगत प्रोजेक्ट असल्यामुळे त्याला व्यावसायिक मागणी जास्त असेल असे सर्व मुद्दे सांगितले. बिल्डर ला येणारा बांधकामाचा एकूण खर्च कसा असेल, एकूण बांधकाम , त्यापैकी विक्री साठी आणि सोसायटीस किती उपलब्ध होईल याबाबत माहिती दिली . तसेच पुणे म न पा कडून लागू होणारा एकूण एफएसआय आणि प्लॉट साईज प्रमाणे वापरता येणारा एफएसआय याबाबत सर्व माहिती स्पष्ट केली. तसेच संस्थेमध्ये सध्या कार्यरत असलेले नॉन पोलुटेड विभागात येणाऱ्या इंडस्ट्री व्यवसाय नवीन इमारतीत येऊ शकतील का ? त्यावर पेशवे सरांनी त्याबाबत नॉन पोलुटेड टर्म्स आणि कंडीशन मध्ये बसणारे व्यवसाय नवीन इमारती मध्ये राहू शकतील असे सांगितले .

वरील सर्व माहिती सादर करून फिजिबिलिटी रिपोर्ट सादरीकरण पूर्ण करण्यात आले.

सूचक :- श्री. गोटाडकि अनुमोदक :- श्री. घोडके

**ठराव सर्वसंमत**

**विषय क्रमांक २ :-** संस्थेच्या फेजिबिलिटी रिपोर्ट बाबत चर्चा करणे .

**ठराव क्रमांक २ :-** वरील ठराव क्रमांक १ मधील तपशिलानुसार संपूर्ण फिजिबिलिटी रिपोर्ट सादर करण्यात आला .तसेच पदाधिकारी आणि उपस्थित सभासद यांनी फिजिबिलिटी बाबत प्रश्न आणि शंका विचारल्या त्यावर पेशवे सर यांनी समाधानकारक उत्तरे दिली आणि सर्वांचे समाधान झाले आणि फिजिबिलिटी रिपोर्ट मुळे पूर्ण क्लारिटी आली आहे, असे सर्वांचे मत झाले . तसेच काही सभासद आज उपस्थित राहू शकले नाहीत परंतु त्यांचे प्रश्न पदाधिकाऱ्यांनी पेशवे सरांना विचारून स्पष्टीकरण करून घेतले , त्यामुळे आता पुढील टप्प्यावर जाण्याबाबत सर्व उपस्थित सभासदांचे एकमत झाले आणि त्यानुसार संस्थेचा फिजिबिलिटी पोर्ट आणि त्यावरील प्रश्न आणि शंका याबाबत सर्वांनी समाधान व्यक्त करून

आर्किटेक्ट चैतन्य पेशवे सर यांचे खूप छान आणि मुद्देसूद मार्गदर्शन केल्याबद्दल संस्थेतर्फे हार्दिक आभार मानण्यात आले. आणि सदर विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक :- श्री नितीन शहा अनुमोदक :- श्री. पांडे

**ठराव सर्वसंमत**

**विषय क्रमांक ३ :-** संस्थेच्या सर्व सभासंदासमोर टेंडर प्रक्रियाबाबत चर्चा करून निर्णय करणे.

**ठराव क्रमांक ३ :-** पी एम सी संजय सूर्यवंशी यांनी सदर विषयानुसार टेंडर प्रक्रियेबाबत सर्व सभासदांना संपूर्ण माहिती सादर केली , तसेच संस्थेला यापूर्वीच टेंडर फॉर्म देण्यात आला होता आणि त्यावर कमिटीने मीटिंग मध्ये विचार विनिमय करून काही आवश्यक बदल सुचविले आहेत. आणि त्यानुसार सदर बदल करून अंतिम टेंडर फॉर्म आज रोजी तयार असल्याचे नमूद करण्यात आले. सदर सभेत काही सभासदांचे त्यांचे गाळ्याचे एरिया बाबत अडचणी आहेत , त्याबाबत पेशवे सर यांजकडून याबाबत कायदेशीर तरतुदीनुसार काय निर्णय घ्यायचा हे ठरविले जाईल असे सूर्यवंशी यांनी सांगितले.

सर्व चर्चा पूर्ण झाल्यावर टेंडर प्रक्रियेचा खालील कार्यक्रम संमत करण्यात आला.

१. टेंडर फीज रुपये १०,०००/- चेक किंवा डि डी संस्थेच्या नावाने .

२. टेंडर सोबत जोडावयाची कागदपत्रे

प्लॅन, प्रॉपर्टी कार्ड कॉपी , सभासद यादी एरिया नुसार

३. टेंडर जाहीर करणे :- ' सकाळ ' पेपर मध्ये जाहिरात देणे. यासाठीचा अंदाजे खर्च रुपये 70000 यास मान्यता देणे.

४. टेंडर प्रक्रिया स्थळ :- सोसायटी प्लस ऑफिस

५. टेंडर जाहीर दिनांक :- 3 जुलै २०२१ जाहिराती द्वारे

६. टेंडर स्वीकृती दिनांक :- टेंडर ३जुलै पासून डेव्हलपर टेंडर घेऊन जाऊ शकतील आणि सिल्ड टेंडर ३१ जुलै २०२१ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत टेंडर दाखल करतील.

७. टेंडर पुढील प्रक्रिया १ ऑगस्ट नंतर कमिटी आणि प्रकल्प सल्लागार ठरवतील असे ठरले.

सूचक :- श्री. हेंमंत नाईक

अनुमोदक :- श्री. खैरे

**ठराव सर्वसंमत**

वरीलप्रमाणे सर्व चर्चा पूर्ण करून उपस्थित सभासदांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**सुप्रिम इंडस्ट्रिअल प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित.**

**अध्यक्ष** **सचिव** **खजिनदार**